पुणे, वर्ष २, अंक १ डिसेंबर २०११ रुपये ३०

# अर्थपूर्ण

व्यक्ती, समाज आणि देशाच्या परिपूर्ण विकासासाठी...

स्वाभिमानी, आनंदी, परिपूर्ण
जीवनाचा करू स्वीकार;
बेरोजगारी, गुन्हेगारी, भ्रष्टाचार,
दहशतवादाला देऊ नकार




डॉ. सुब्रह्मण्यम स्वामी
अनिल बोकिल
संदीप वासलेकर

## पैसा झाला मोठा!

गुंतवणूक विशेष

गोपाळ गलगली
विजय तरवडे
वंदना धर्माधिकारी
वॉरेन सखाराम बफेट



यमाजी मालकर
ymalkar@gmail.com

# जगात आर्थिक ‘ट्रॅफिक जॅम’!

**पैशांच्या व्यवहारांनी सर्वांनाच एका चौकात आणून उभे केले आहे. ट्रॅफिक जॅम झाले आहे. त्यातून कोणाचीच सुटका नाही. पण असा विचार करून जग चालणार कसे? काही तरी मार्ग तर असणारच आहे. तो मार्ग शोधणारी माणसे जगभर आहेत. अशी आपल्यातीलच तीन माणसे गेल्या महिन्याभरात भेटली. त्यांनी या कोंडीचा अभ्यास तर केलाच पण ती सोडविण्याचे काही चांगले मार्गही जगासमोर ठेवले आहेत.**

अमेरिकन सरकारसमोरील आर्थिक पेचप्रसंग सुटण्यासाठी गुंतवणूक गुरू वॉरेन बफेट यांनी श्रीमंतांवर अधिक कर लावण्यासाठी ‘वॉरेन बफेट टॅक्स’ का सुचविला आहे?, जगातील श्रीमंत समजल्या जाणाऱ्या युरोप-अमेरिकेत गेली दीड-दोन शतके चर्चेत असलेल्या ‘रॉबीन हूड टॅक्स’ची २०११ मध्येच इतकी चर्चा का वाढली आहे? युरोपला आर्थिक पेचप्रसंगातून काढण्यासाठी प्रयत्नशील असलेली जर्मनी ‘ट्रॅन्झॅक्शन टॅक्स’ची एवढी चर्चा आताच का करते आहे?, जगाची ‘ फॅक्टरी’ बनलेला चीन म्हणजे नवी महासत्ता अडचणीत का सापडली आहे?, भारतात जीएसटीसंबंधी एकमत का होत नाही आणि महागाई आटोक्यात का येत नाही? जगभरातले गुंतवणूकदार का होरपळून निघत आहेत? या आणि अशा शेकडो आर्थिक प्रश्नांची सध्या कधी नव्हे इतकी चर्चा सुरू आहे. जणू सर्वशक्तिमान आणि बुद्धिमान माणसाच्या आयुष्याचे इतर सर्व पैलू फिके पडले आहेत. गेल्या सहा-आठ महिन्यांतील माध्यमांतील विषय पाहिले की आपल्यालाच आश्चर्य वाटते की जगाचे इतके ‘पैशीकरण’ नेमके कधी झाले? जगाला दिवस-रात्र फक्त पैशाचा विषय का सतावतो आहे? एरवी अत्यावश्यक व्यवहाराचा भाग म्हणून हे सर्व होत असते तर आपण त्याकडे दुर्लक्ष केले असते. मात्र हे जे होते आहे, ते एक तर जगाच्या कानाकोपऱ्यात म्हणजे जगव्यापी होते आहे आणि त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे ते आपल्या प्रत्येकाच्या दररोजच्या आयुष्याला भिडते आहे. त्यामुळे आपण त्यात भाग घ्यायचा की नाही, ही निवड आता आपली राहिलेली नाही. तुम्ही कोणत्याही समूहात जगत असलात तरी तुमची या ‘पैशीकरणा’तून सुटका नाही. जगात असे आर्थिक व्यवहारांचे ट्रॅफिक जॅम झाले आहे. त्यात आपण अडकणार नाही, आपण वेगळ्याच मार्गाने निघून जाऊ, आपण त्या दिशेने जाणारच नाही, असे प्रयत्न सर्व सुटी माणसे, संस्था, राज्य आणि देशांनी करून पाहिले, मात्र सर्व शेवटी त्याच चौकात पोहचले, ज्या चौकात हे ट्रॅफिक जॅम झाले आहे. आता अडचण अशी झाली आहे की मागेही जाता येत नाही कारण मागे भली मोठी रांग लागली आहे. बिचाऱ्यांना माहीतच नव्हते की पुढे एवढे ट्रॅफिक जॅम आहे. आणि पुढे जाण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही कारण पुढे सरकायलाही जागा नाही.

तुम्हाला आश्चर्य वाटेल पण पुण्या-मुंबईच्या किंवा आपल्या कोणत्याही शहरात वाहतूक कोंडी झाल्यावर जे सर्व काही होते ते सर्व या आर्थिक कोंडीत झाले आहे. त्याचा अर्थ असा

की सरकाररूपी पोलिस ही कोंडी फोडण्याचा प्रयत्न करते आहे मात्र आता तेही हतबल झाले आहे. काहींच्या गाड्या इतक्या मोठ्या आहेत की, त्यांना हलायलाही जागा नाही. काही बलप्रयोग करून आपला घोडा पुढे दामटण्याचा प्रयत्न करत आहेत, पण त्याचाही उपयोग होत नाही. नाकातोंडात धूर जाऊन दुर्बल झालेली मंडळी या रेटारेटीतून आता सपशेल माघार घेऊ इच्छितात, मात्र त्यांना आता तसे कोणी करू देत नाही. रुग्णवाहिकेची या कोंडीतून सुटका नाही, अशी अभूतपूर्व गुंतागुंत जगाच्या या ट्रॅफिक जॅममध्ये झाली आहे.

ट्रॅफिक जॅम सुटावी, म्हणून जगातील तज्ज्ञ मंडळी प्रयत्न करताहेत, नाही असे नाही, मात्र त्यातील बहुतेकांची भूमिका आपला समूह, आपले राज्य, आपला देश किंवा आपला खंड यातून कसा बाहेर पडेल, अशी आहे. आता विचार करा जर कोंडी जागतिक आहे, तर त्याची उकलही जागतिकच असावी लागेल. पण त्याविषयी मतभेद आहेत. तात्पर्य ट्रॅफिक जॅम वाढत चालली आहे. तुम्ही जगाच्या कोणत्या कोपऱ्यात राहता, कोणत्या वर्णाचे किंवा जातीधर्माचे आहात, कोणत्या समूहात जगता...या आणि अशा भेदांना छेद देऊन पैशांच्या व्यवहारांनी सर्वांनाच एका चौकात आणून उभे केले आहे. त्यातून कोणाचीच सुटका नाही.

पण असा विचार करून जग चालणार कसे? काही तरी मार्ग तर असणारच आहे. तो मार्ग शोधणारी माणसे जगभर आहेत. अशी




आपल्यातीलच तीन माणसे गेल्या महिन्याभरात भेटली. त्यांनी या कोंडीचा अभ्यास तर केलाच पण ती सोडविण्याचे काही चांगले मार्गही जगासमोर ठेवले आहेत. माजी केंद्रीय मंत्री आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात लढा देणारे सुब्रह्मण्यम स्वामी, प्रामाणिक-समृद्ध आणि शांत जीवनासाठी पैशाच्या व्यवस्थापनाचा मार्ग अर्थक्रांतीच्या प्रस्तावाच्या माध्यमातून गेली एक तप मांडत असलेले अर्थक्रांती प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल बोकील आणि जगातल्या पन्नासावर देशांच्या प्रमुखांशी सल्लामसलत करणारे संदीप वासलेकर ही ती तीन माणसे. हे तिघेही जण वेगवेगळ्या निमित्ताने पुण्यात येऊन गेले. त्यांनी त्या त्या व्यासपीठावर मांडलेल्या कल्पना जगापुढील कोंडी फोडण्यास सक्षम आहेत, असे वाटले. म्हणून खास 'अर्थपूर्ण' च्या वाचकांसाठी त्यांचे ते विचार या अंकात दिले आहेत. 'अर्थपूर्ण'च्या वाचकांना जग आणि भारताची सध्याची परिस्थिती समजून घ्यायला ते उपयोगी ठरतील, अशी आशा वाटल्याने या अंकात ते सविस्तर प्रसिद्ध केले आहेत.

वाचक आणि एक सुजाण नागरिक म्हणून आपण त्या विचारांशी सहमत असालच, असे नाही. मात्र जगाने आता एक मोठे वळण घेण्याची, मूलभूत बदलांना सामोरे जाण्याची गरज आहे, याच्याशी आपण सर्वच जण सहमत होऊयात.

'अर्थपूर्ण'ला एक वर्ष पूर्ण झाले. आपले जग कोणत्या दिशेने बदलेले पाहिजे, याविषयीच्या सध्याच्या संभ्रमातून आपल्याला बाहेर पडण्याचा हा प्रवास या नव्या वर्षात अधिक स्पष्ट होईल, अशी खात्री आहे. त्या प्रवासातही तुम्ही बरोबर असणार आहात ना?